महाराष्ट्र पोलीस

# एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन जळगाव

फोन ०२५७-२२१०५०० फॅक्स ०२५७-२२१०१६३
Email ID : pstnmidc@gmail.com

## प्रेसनोट

एम.आय.डी.सी.पो.स्टे.जळगांव
दि. 01/09/2025

प्रति,

दै.--------------- संपादक,

जळगांव

विषय :- गावठी पिस्टल जवळ बाळगणारा एम.आय.डी.सी.पोलीसांच्या जाळ्यात.....

दि.30/08/2025 रोजी रात्री 20.00 सुमारास मा.पोलीस निरिक्षक बबन आव्हाड यांना गोपणीय बातमी मिळाली की, कुसुंबा गावाच्या परिसरात एक इसम हा दोस्ती पान सेंटर समोर रोडवर पिस्टलचा धाक दाखवुन लोकांमध्ये दहशत माजवित असल्याची माहीती मिळाल्याने सदर बाबत खात्री करुन कारवाई करण्याचे आदेश मा.पोलीस निरिक्षक यांनी दिले वरुन पोउपनि राहुल तायडे, पोउपनि चंद्राकांत धनके, पोकॉ गणेश ठाकरे, पोकॉ किरण पाटील, पोकॉ नितीन ठाकुर, पोकॉ राहुल घेटे असे कुसुंबा शिवारात तात्काळ रवाना झाले सदर गुप्त माहीतीमधील घटनास्थळावर पोहचताच पोलीस गाडी पाहताच जळगाव ते छत्रपती संभाजी नगर रोडने कुसुंबा कुसुंबा शिवारात एक संशयीत इसम पळुन जावु लागला त्यावेळी पोलीस स्टाफ यांनी त्याचा पाठलाग करुन त्यास शिताफीने पकडुन त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने त्याचे नाव अमोल सुरेश खैरनार, वय-28 वर्षे, रा. सुप्रिम कॉलनी, जळगाव असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी सदर इसमावर संशय बळावल्याने पोलीस स्टाफ यांनी त्याची दोस्ती पानसेंटर, हायवेच्या बाजुला, कुसुंबा शिवार याठिकाणी अंगझडती घेतली असता त्याच्या डाव्या कमरेला गावठी कट्टा लावलेला दिसुन आला. सदरचा गावठी कट्टा त्याचे कमरेतुन काढुन दोन पंचासमक्ष सदरचा गावटी कट्टा कि.अ. 10000/ जप्त करुन या प्रकरणी पोलीस शिपाई राहुल घेटे यांनी सरकार तर्फे एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन ला फिर्याद दाखल केली असुन एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे गुरन 622/2025 शस्त्र अधिनियम कलम 3/25 व महाराट्र पोलीस अधिनियम कलम 135 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ/2922 रामदास कुंभार हे करीत आहेत.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री महेश्वर रेड्डी सो., मा. अपर पोलीस अधीक्षक श्री अशोक नखाते सो , मा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितीन गनापुरे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

जनसंपर्क अधिकारी
जळगाव जिल्हा पोलीस


vivo X200 FE
ZEISS
24mm f/1.88 1/275s ISO72
09/01/2025, 13:49